**नियमित फौजदारी खटला क्र.७६/२०२५**
**शासन वि. स्वप्नील व ईतर**

–:: **नि.क्र.१ लगत आदेश** ::–

मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. आरोपी क्र.४ गैरहजर आहे. आरोपी क्र.५ विरुध्द फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २९९ प्रमाणे दोषारोप दाखल आहे. परंतु ते प्रकरणामध्ये गैरहजर आहेत. तरीसुध्दा आजरोजी आरोपीच्या वकिलांनी आरोपी क्र.५ च्या गैरहजेरीचा अर्ज (नि.२७) दिला. सदर अर्ज नामंजूर केला. आरोपी क्र.४ च्या गैरहजेरीचा अर्ज दाखल नाही. भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम २६३ प्रमाणे ६० दिवसाच्या आत दोषारोप निश्चित करणे आवश्यक आहे. आरोपी हे दि.१५/१०/२०२५ रोजी प्रकरणात हजर झालेले आहेत. आरोपींनी सन्माननीय उच्च न्यायालयामध्ये क्रिमिनल रीट नं.२०५/२०२५ दाखल केलेले आहे. परंतु त्यामध्ये सदर प्रकरणाला स्थगिती नाही. सबब सदर प्रकरणामध्ये प्रतीक्षा करण्यास किंवा प्रकरण तहकूब करण्यास पुरेसे कारण नाही. आरोपी क्र.४ च्या कसुरामुळे आरोपी क्र.४ विरुध्द गैरजमानती वॉरंट व त्याच्या जामीनदारास जामीन बंधपत्र रद्द करून त्याची रक्कम का वसूल करू नये याबाबत कारणे दाखवा नोटीस काढावी.

०२. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.01.03 17:15:15 +0530

**ठिकाण – देवणी**
**दिनांक – ०३–०१–२०२६**

**( शरद अ. सुरजुसे )**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**
**देवणी.**